# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# मंदिराचा एक पुढारी येशूची भेट घेतो


लेखक: Edward Hughes
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
रूपान्तरकार: M. Maillot; Sarah S.



60 गोष्टींतील 41 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी　　Marathi

एके दिवशी येशू जेंव्हा मंदिरात गेला तेंव्हा लोक परमेश्वराच्या नावाचा अपमान करित आहे असे येशूने पाहिले.



1

ते मंदिराच्या आंतमध्ये प्राण्यांची विक्री करीत होते तसेच चलन बदली करीत होते. (पैशांची अदलाबदल करत होते).



2

तेंव्हा त्याने दोऱ्यांचा एक चाबूक बनवून, खरेदी–विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना मंदिरातून हाकलून लावले. "हि येथून काढून घ्या; माझ्या पित्याच्या घराची बाजारपेठ करु नका" अशी त्याने आज्ञा केली. येशूने त्याच्या पित्याच्या घरावर प्रीति केली.



3



मंदिरातून व्यापाऱ्यांना घालवून देण्याचा येशूकडे काय अधिकार आहे याचे चिन्ह दाखविण्यास अधिकाऱ्यांनी येशूला सांगितले. येशूने त्यांना उत्तर दिले, "तुम्ही हे मंदिर मोडून टाका, आणि मी तीन दिवसांत ते उभारीन." अशक्य! हे मंदिर बांधण्यास ४६ वर्षे लागली.

4

परंतू येशू तर त्याच्या शरीराविषयी बोलला होता. मंदिराप्रमाणेच, त्याचे शरीर देखिल देवाचे राहण्याचे ठिकाण आहे. येशू जरी वधस्तंभावर मरण पावणार तरी देव पिता तिसऱ्या दिवशी त्याला मरणातून जिवंत करणार हे त्याला माहित होते.



5



रात्रीच्या वेळी, मंदिराच्या पुढाऱ्यांपैकी एकाने येशूची भेट घेतली. येशू हा देवाने पाठविलेला आहे हे चमत्कारांमुळे त्याला कळून आले होते. निकदेम देवाविषयी अधिक शिकण्यासाठी येशूकडे आला.

6



येशूने निकदेमला म्हटले की, देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी लोकांनी नविन जन्म घेणे आवश्यक आहे. त्याला हे कळले नाही, तो म्हणाला, "म्हातारा झालेला मनुष्य कसा जन्म घेऊ शकेल?" निकदेम धार्मिक प्रवृत्तीचा मनुष्य होता, हे पुरेसे नव्हते काय?

7



येशूने उत्तर दिले, "आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहे." "देवाचा आत्मा असाच आहे. लोकांना वारा दिसत नाही किंवा तो त्यांना कळत नाही. वारा काय करतो केवळ त्याचे कार्य दिसते."

8


फार वर्षांपूर्वी इस्त्राएल लोकांनी मोशेच्या विरुध्द् तक्रार केली होती,
"आम्हांला खाण्यासाठी अन्न नाही, पाणी नाही, आणि जे अन्न परमेश्वर देतो ते
आम्हांला आवडत नाही," याप्रकारे त्यांनी ओरड केली होती
त्याची निकदेमला येशूने आठवण करुन दिली.
9
लोकांच्या पापामुळे परमेश्वराला राग
आला. त्याने त्यांच्यात आग्ये साप
पाठविले. ते साप लोकांना चावले व
त्यांच्यातील पुष्कळ लोक मरण पावले.
10
"आम्ही पाप केले आहे. देवाने साप काढून
टाकावे अशी देवाकडे प्रार्थना करा," याप्रकारे
लोकांनी मोशेला विनंती केली. म्हणून
मोशेने त्यांच्यासाठी प्रार्थना केली.
परंतू देवाने साप काढून टाकले नाही.
11
एक आग्या साप तयार करुन उंच खांबावर
टांगावा, असे परमेश्वराने मोशेला सांगितले.
"ज्या प्रत्येकास आग्ये साप चावा घेतील ते
जेंव्हा खांबावर टांगलेल्या या सापाकडे
पाहतील तेंव्हा ते वाचतील."
12
असे देवाने वचन दिले. मोशेने
तांब्याचा साप बनविला आणि
ज्यांनी कोणी त्याच्याकडे
पाहिले ते सर्व बरे झाले.
13
येशूने निकदेमला म्हटले, जसा
तांब्याचा साप उंच केला होता तसे
मनुष्याच्या पुत्रालाहि उंच केले
पाहिजे. पापासाठी येशू
जेथे मरणार होता त्या
वधस्तंभाविषयी
येशू बोलला.
14













मंदिराचा एक पुढारी येशूची भेट घेतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

योहान २–३, गणना २१

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!